महाराष्ट्र शासन
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१
Email Id – jdhepune@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. शिससं/उशि/पुवि/पीएमएस २०१८-१९/ 1966 दिनांक : ०४.०८.२०१८

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कनिष्ठ / वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.

**विषय : - अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०१८-१९ करिता स्कॉलरशिप पोर्टलवर कोर्सेसची माहिती भरणेबाबत...**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालनालयाचे ईमेलद्वारे प्राप्त पत्र दि. ०३.०८.२०१८.

उपरोक्त विषयास अनुसरुन राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकोत्तर शिक्षणाकरीता १०० टक्के केंद्र शासन पुरस्कृत "अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०१८-१९" च्या नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व नुतनीकरणाचे (Renewal) फॉर्म ऑनलाईन पध्दतीने जमा करण्यासाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर मागविण्यात येतात. पात्र विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरताना चालू शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशित कोर्सची माहिती भरावी लागते. परंतु काही महाविद्यालयांनी अद्यापही त्यांचे कोर्सेसची माहिती महाविद्यालयाच्या प्रोफाईलवर अद्ययावत भरलेली नाही. **तरी प्रोफाईलवर कोर्सेस अद्ययावत न झालेल्या सर्व महाविद्यालयांनी दि. १५ ऑगस्ट, २०१८ पर्यंत प्रोफाईलवर लॉग इन करुन सदर माहिती अद्ययावत करावी. त्यानंतर विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करताना सदर कोर्सचा महाविद्यालय प्रोफाईलवर उल्लेख नसला आणि विद्यार्थ्यांना अर्ज करता आला नाही तर त्याकरीता सर्वस्वी महाविद्यालय जबाबदार राहील. तरी सर्व महाविद्यालयांनी मुदतपूर्व प्रोफाईल अद्ययावत करावे.**

**(डॉ.व्ही.पी.नारखेडे)**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे १

प्रति - १. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांना माहितीसाठी सादर.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. प्राचार्य, विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण, पुणे विभाग, पुणे.
७. प्राचार्य, वैद्यकिय महाविद्यालये.
८. मा. शिक्षण उपसंचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण, पुणे विभाग, पुणे.
९. मा. शिक्षण उपसंचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण, नाशिक विभाग, नाशिक.